**GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI**

(Established by Government of Maharashtra Notification No.MISC-2007/(372/07) UNI-4 Under Sub Section (2) of Section-3 of the Maharashtra Universities Act 1994 (Mah. XXXV of 1994) Dated 27 Sept 2011)

MIDC Road, Complex
Gadchiroli-442605 (M. S.) India
Phone/Fax-07132-223324
Website: www.unigug.com

**Office of the OSD** E-Mail: rokade1134@gmail.com

Dr. S.M. Rokade
Officer On Special Duty

No./GUG/OSD/ 01 /2016
Date 23.11.2016

# परिपत्रक

कृषी क्षेत्रात आगामी अत्याधुनिक तंत्रज्ञान व यशोगाथांची माहिती संपूर्ण क्षेत्राला व्हावी व त्यातून इतरांनी प्रेरणा घेवून कृषी क्षेत्राला नवी भरारी दयावी या हेतूने अॅग्रो व्हिजन या कृषी प्रदर्शनाचे प्रवर्तक केंद्रीय मंत्री मा. ना. नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून नागपूर येथे दिनांक ११ ते १४ नोव्हेंबर २०१६ या कालावधीत अॅग्रो व्हिजन कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये लघुउद्योजक आपल्या उत्पादनासहीत विशेष प्रकर्षाने सहभागी झाले होते. त्याअनुषंगाने गडचिरोली जिल्हयातील उपलब्ध साधन संपत्ती बांबु यावर आधारीत उद्योग उभारणीसाठी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे **"अगरबत्ती काड्या अद्ययावत पद्धतीने तयार करण्याची प्रक्रिया"** या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि.२४/११/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता विद्यापीठाच्या सभागृहात करण्यात आलेले आहे.

गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन.व्ही.कल्याणकर, अध्यक्ष म्हणून कार्यशाळेस उपस्थित राहणार असून श्री. जी. श्रीधरन, विभाग प्रमुख, आय.टी.सी., चेन्नई यांचे साधन व्यक्ती म्हणून मोलाचे मार्गदर्शन लाभणार आहे. या उद्योगाशी निगडीत तसेच नवनिर्माण उद्योग उभारण्याची अभिलाषा बाळगणाऱ्या नवयुवकांनी तसेच या अनुषंगाने अभ्यास व संशोधन करणाऱ्या अध्यापक, संशोधक, व्यावसायीक अभ्यासक्रमाशी निगडीत विद्यार्थी व ईच्छूकांनी या कार्यशाळेचा लाभ घेण्यासाठी उपस्थित राहावे, ही विनंती.

(डॉ. एस.एम.रोकडे)
विशेष कार्य अधिकारी
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:**
मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरिता अग्रेषित.